।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४१ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

४२

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४२ वे नवीन वर्ष २२ वे | रविवार दि.१६ फेब्रुवारी २०२५ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ८ वा

सिंचनात् राष्ट्रोद्धार :

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे

## स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर, या कामाचा

# ।। भूमिपूजन समारंभ ।।

✻ शुभहस्ते ✻

**मा. ना. डॉ. श्री. राधाकृष्ण सिंधुताई एकनाथराव विखे पाटील**
मंत्री, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ), महाराष्ट्र राज्य, मुंबई

✻ अध्यक्षतेखाली ✻

**मा.ना.श्री. शंभूराज विजयादेवी शिवाजीराव देसाई**
मंत्री, पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

✻ प्रमुख उपस्थिती ✻

**मा.ना.श्री. जयकुमार कमल भगवानराव गोरे**
मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज, महाराष्ट्र राज्य
तथा पालकमंत्री, सोलापूर जिल्हा

आणि
खालील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

✻ प्रमुख अतिथी ✻

मा.खा.श्री. ओमप्रकाश राजेनिंबाळकर
मा. आ. श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील
मा. आ. श्री. सुभाष देशमुख
मा. आ. श्री. नारायण पाटील
मा. आ. श्री. उत्तमराव जानकर
मा. आ. श्री. बाबासाहेब देशमुख

मा. खा. श्री. धैर्यशिल मोहिते-पाटील
मा. आ. श्री. अरुण लाड
मा. आ. श्री. दिलीप सोपल
मा. आ. श्री. समाधान आवताडे
मा. आ. श्री. राजू खरे
मा. आ. श्री. देवेंद्र कोठे

मा. खा. कु. प्रणिती शिंदे
मा. आ. श्री. जयंत आसगांवकर
मा. आ. श्री. विजय देशमुख
मा. आ. श्री. सचिन कल्याणशेट्टी
मा. आ. श्री. अभिजीत पाटील

सदर कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

✻ आपले विनित ✻

श्री. दीपक कपूर
(भा.प्र.से.)
अप्पर मुख्य सचिव
जलसंपदा विभाग,
महाराष्ट्र राज्य

श्री. अतुल कपोले
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि. महामंडळ,
पुणे

श्री.डॉ. ह. तु. धुमाळ
मुख्य अभियंता (वि.प्र.)
जलसंपदा विभाग, पुणे

श्री. कुमार आशीर्वाद
(भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी
सोलापूर

श्री. धि. बा. साळे
अधीक्षक अभियंता
भीमा कालवा मंडळ,
सोलापूर

**सोमवार दि. १७ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी २ वा.**
**स्थळ : जाधववाडी (चिकमहूद-लक्ष्मीनगर रस्ता), ता. सांगोला, जि. सोलापूर.**

# सांगोला तालुक्यात वीज ग्राहकांकडे २ कोटी ९९ लाख ९६ हजार रुपयांची थकबाकी

## ग्राहकांनी विज बिल भरून सहकार्य करण्याचे महावितरणचे आवाहन

सांगोला : वारंवार वीजबील भरण्याचे आवाहन करूनही विज बिल न भरणाऱ्या सांगोला तालुक्यातील थकबाकीदारांचा महावितरणलाच शॉक बसला.. असे म्हणण्याची वेळ आली आहे. सांगोला तालुक्यातील सांगोला व हातीद विभागातील १७ हजार ८३४ वीज ग्राहकांकडे महावितरणची २ कोटी ९९ लाख ९६ हजार रुपयांची थकबाकी असल्याची माहिती महावितरण कार्यालयाचे उपकार्यकारी अभियंता गणेश पोवार व हणमंत बनसोडे यांनी दिली.

ग्राहकांनी विज बिल भरून सहकार्य करावे असेही ते म्हणाले. महावितरणने वीज कनेक्शन कायमस्वरूपी तोडलेल्या थकीत वीजबिल ग्राहकांसाठी अभय योजना जाहीर केली असून अभय योजना २०२४ नुसार थकबाकी एकरकमी भरल्यास थकबाकी वरील व्याज आणि विलंब आकारात सूट देण्यात येणार आहे.

दिलेल्या मुदतीत बिलांचा भरणा न केल्याने महावितरणच्या सांगोला तालुक्यातील थकबाकीदारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे ग्राहकांनी विज बिल भरून महावितरणला सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून करण्यात आले आहे.

सांगोला तालुक्यातील हातीद विभागात ७ हजार ४४२ घरगुती ग्राहकांकडे ८४ लाख ४५ हजार रुपये, ४८० वाणिज्य ग्राहकांकडे १३ लाख ६४ हजार रुपये, ५७ औद्योगिक ग्राहकांकडे ५ लाख ९० हजार रुपये अशी ७ हजार ९७९ ग्राहकांकडे १ कोटी ३ लाख ९९ हजार रुपये थकबाकी आहे. सांगोला विभागात ८ हजार ७६६ घरगुती ग्राहकांकडे १ कोटी ३५ लाख ६० हजार रुपये, ८२८ वाणिज्य ग्राहकांकडे ३६ लाख ७३ हजार रुपये, ७२ औद्योगिक ग्राहकांकडे ५ लाख ६८ हजार रुपये, १८९ शासकीय कार्यालयांकडे १७ लाख ९६ हजार रुपये अशी ९ हजार ८५५ ग्राहकांकडे १ कोटी ९५ लाख ९७ हजार रुपयांची थकबाकी आहे. अशी एकूण सांगोला तालुक्यातील १७ हजार ८३४ वीज ग्राहकांकडे २ कोटी ९९ लाख ९६ हजार रुपयांची थकबाकी आहे.

# शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये मुलींसाठी समुपदेशन व्याख्यान संपन्न

सांगोला : रामकृष्ण टेक्निकल एज्युकेशन सोसायटी संचलित शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये संस्थेचे अध्यक्ष श्री.बी. आर.गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली मुलींसाठी विशेष समुपदेशन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थिनींना शैक्षणिक, व्यावसायिक आणि वैयक्तिक मार्गदर्शन प्रदान करणे होते. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. संगीता पाटील या उपस्थित होत्या तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कॉलेजचे प्राचार्य डॉ.आर.ए.देशमुख यांनी भूषविले.

प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. प्रस्तावनेत प्राचार्य डॉ. आर.ए.देशमुख यांनी विद्यार्थिनींसाठी अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे महत्त्व सांगितले आणि भविष्यात अधिक उपयुक्त उपक्रम राबवले जातील,असे सांगितले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ.संगीता पाटील मॅडम यांनी विद्यार्थिनींना करिअर संधी, मानसिक आरोग्य, तणाव व्यवस्थापन आणि आत्मविश्वास वाढीविषयी मार्गदर्शन केले. या वेळी मार्गदर्शकांनी इम्युनिटी, हिमोग्लोबिन, हार्मोनल असंतुलन यांसारख्या आरोग्यविषयक मुद्द्यांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच करिअर ध्येये निश्चित करण्याचे आणि विविध क्षेत्रात मुलींसाठी उपलब्ध असलेल्या संधींचा शोध घेण्याचे महत्त्व अधोरेखित केले. अडथळे आणि आव्हानांवर मात करून मुली त्यांचा आत्मविश्वास आणि आत्मसन्मान कसा वाढवू शकतात याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले.तसेच विद्यार्थिनींनी त्यांच्या शंकांचे निरसन करून व्याख्यानाचा लाभ घेतला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. आर. ए. देशमुख, सर्व महिला शिक्षिका यांच्यासह समन्वयक म्हणून प्रा. श्रीया कुलकर्णी व प्रा. कोमल पाटील यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन श्रीया कुलकर्णी व आभारप्रदर्शन कोमल पाटील यांनी केले.प्रा.एस.एस.कांबळे इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार डॉ. रमेश टेंभूर्णे यांनी मानले.

# सुप्रसिद्ध कवी अनंत राऊत यांचे मंगळवारी काव्यमय समाजप्रबोधन

## सांगोला महाविद्यालयामध्ये वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ



सांगोला : सुप्रसिद्ध कवी अनंत राऊत यांचे मंगळवार दि. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता सांगोल्यामध्ये काव्यमय समाजप्रबोधन होणार आहे. येथील सांगोला महाविद्यालयामध्ये दि. १७ व १८ फेब्रुवारी रोजी वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ होत आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून कवी अनंत राऊत उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सांगोला तालुका उच्च शिक्षण मंडळाचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड भूषविणार आहेत, या कार्यक्रमास सर्व संस्था पदाधिकारी, हितचिंतक, साहित्यप्रेमी नागरिक उपस्थित राहणार असल्याची माहिती या महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सुरेश भोसले, स्नेहसंमेलन कार्याध्यक्ष प्रा.संतोष लोंढे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

दोन दिवस चालणाऱ्या या विद्यार्थी स्नेहसंमेलनामध्ये सोमवार दि.१७ फेब्रुवारी रोजी शेलापागोटे, रांगोळी प्रदर्शन होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. गजानन भाकरे मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सांगोला तालुका उच्च शिक्षण मंडळाचे सचिव ॲड.उदय (बापू) घोंगडे हे आहेत.दुपारी विद्यार्थी विविध गुणदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस निरीक्षक बी.एस. खंणदाळे यांचे हस्ते होणार आहे. मंगळवार दि. १८ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या संगीत शेलापागोटे कार्यक्रमाचे उदघाटन सांगोला तालुका उच्च शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष प्रा.पी.सी.झपके यांचे हस्ते होणार आहे.

यावेळी प्रेरणा आणि गलक्सी भिंतीपत्रकाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी क्रीडा, रांगोळी, कथाकथन, काव्यवाचन, निबंध व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे असल्याची माहिती संयोजकांचेवतीने देण्यात आली आहे.

# सेतू कार्यालयात अधिकचे पैसे मागितल्यास क्यूआर कोड वर तक्रार नोंदवण्याची सुविधा




सोलापूर : जिल्ह्यातील नागरिकांना तसेच विद्यार्थ्यांना लागणारे विविध प्रकारचे दाखले उतारे व अन्य प्रमाणपत्रे ऑनलाईन पध्दतीने आपले सरकार सेवा केंद्र अथवा सेतू कार्यालयातून दिले जातात. परंतु बऱ्याचदा आपले सरकार केंद्र अथवा सेतू कार्यालयात विविध दाखले, उतारे व प्रमाणपत्रे काढण्यासाठी आलेल्या सर्वसामान्य नागरिकांना मध्यस्थ व्यक्तीकडून शासनाने विहित केलेल्या रकमेपेक्षा अधिकच्या रक्कमेची मागणी करण्यात येत असल्याची वरिष्ठ अधिकारी वरिष्ठ यांच्याकडे तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यामुळे सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सर्वसामान्य नागरिकांना मध्यस्थ व्यक्ती (एजंट) यांच्याकडून पैशाची मागणी होऊ नये अथवा झाल्यास तात्काळ तक्रार करता यावी यासाठी प्रत्येक आपले सरकार सेवा केंद्र अथवा सेतू कार्यालयात दर्शनी भागात क्यू आर कोड उपलब्ध करून देण्यात येत आहे, संबंधित नागरिकांनी हा किंवा कोड स्कॅन करून यावर तक्रार नोंदवण्याची सुलभ सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे, यावरील तक्रारीची तात्काळ दखल घेऊन त्यासंबंधी कारवाई करण्यात येणार आहे. हा क्यु आर कोड सोलापूर जिल्ह्यातील सर्व सीएससी सेंटर तसेच सेतू कार्यालय, तहसील कार्यालय आणि प्रांताधिकाऱ्यांच्या कार्यालयात लावण्यात आले आहेत.

यामध्ये केंद्रचालकांनी दाखल्या साठी शासनाने ठरवून दिलेल्या दरापेक्षा अधिकची रक्कम मागणी केल्यास, दाखला विहीत मुदतीत दिला नाही अथवा विलंब केला तर, दाखल्या संदर्भात संबधिताला एसएमएस व्दारे माहिती न दिल्यास, एजंटाव्दारे संबधित नागरिकांकडे अधिकचे पैसे मागणी केल्यास अशा कोणत्याहीप्रकारच्या तक्रारी असल्यास नागरिकांनी यावर दिलेला क्यु आर कोड स्कॅन केल्यास त्यावर तात्काळ आपली तक्रार नोंदविली जाते. तसेच आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तातडीने चौकशी करून पुढील कार्यवाही केली जाते. त्यामुळे नागरिकांना कोणाला भेटण्याची अथवा अधिकचे पैसे देण्याची गरज राहणार नाही. त्यामुळे नागरिकांनी जर असे प्रकार कोठे घडत असतील तर जिल्हा प्रशासनाने क्यू आर कोड स्कॅन करून तक्रार नोंदवणीच्या दिलेल्या अद्यावत सुविधेचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे, आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

हा क्यु आर कोड कोणत्याही मोबाईल पवरून स्कॅन करून नागरिकांना सुलभरित्या तक्रार नोंदविण्याकरिता उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. आज दिनांक १३ फेब्रुवारी २०२५ रोजीपर्यंत एकुण ८ तक्रारी क्यु आर कोड द्वारे नोंदविल्या गेलेल्या आहेत.

या तक्रारीमधील १ तक्रारीबाबत अर्जदार यांना कळविणेत आले आहे. उर्वरीत प्रकरणांबाबत चौकशी अहवाल प्राप्त करून तक्रारीत तथ्य आढळून आल्यास कडक कारवाई करण्यात येईल, असे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४२ वे अंक-११ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# सांगोला तालुक्यातील ८१ गावांवर वीज पुरवठा खंडित केल्यामुळे जलसंकट

सांगोला : सांगोला तालुक्याच्या पिण्याच्या पाण्याची मदार असलेल्या एकमेव शिरभावी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा जलशुद्धीकरण केंद्र व पंढरपूर पंप हाऊसच्या सुमारे ५ कोटी १७ लाख रुपये थकीत वीज बिलापोटी वीज वितरण कंपनीकडून योजनेसह पंप हाऊसचा वीज पुरवठा खंडित केल्यामुळे मागील तीन महिन्यांपासून शिरभावी पाणीपुरवठा योजना बंद पडली आहे.

दरम्यान आगामी उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर वीजेअभावी सांगोला तालुक्यातील ८१ गावांवर जलसंकट कोसळणार असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. सांगोला तालुक्यातील ८१ गावांसह वाडी वस्तीवरील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी वरदायिनी असणाऱ्या शिरभावी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेच्या शिरभावी येथील जलशुद्धीकरण केंद्र व पंढरपूर येथील पंप हाऊससाठी वापरलेल्या वीज बिलांच्या सुमारे ५ कोटी १७ लाख रुपये थकीत वीज बिलापोटी वीज वितरण कंपनी सोलापूर यांच्या आदेशाने स्थानिक वीज वितरण कंपनीकडून २१ नोव्हेंबर २०२४ शिरभावी येथील पंपहाऊसचा तर पंढरपूर पंप हाऊसचा डिसेंबर २०२४ मध्ये वीज पुरवठा खंडित केल्यामुळे शिरभावी पाणीपुरवठा योजना बंद आहे.दुसरीकडे सन २००५ पासून ते डिसेंबर २०२४ पर्यंत शिरभावी योजनेवर खर्च झालेली तूट शासनाकडून सुमारे ४१ कोटी २३ लाख रुपये प्राप्त न झाल्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडून सदरची योजना चालविणे बंद केली तर शिरभावी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेंतर्गत तालुक्यातील पाईपलाईन दुरुस्ती, देखभाल, गळत्या काढणे , कामगार पुरवठा आदींची सुमारे १ कोटी ८५ लाख रुपयेची बीले मिळाली नाहीत. म्हणून ठेकेदारांने २९ जुलै २०२४ पासून योजना चालविणे बंद केली आहे.त्यामुळे शिरभावी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना आर्थिक अडचणीत सापडली आहे.

आजी-माजी लोकप्रतिनिधींनी प्रयत्न करून उन्हाळ्यापूर्वी नवीन जलजीवन मिशन योजनेतून पाणीपुरवठा चालू करण्यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी होत आहे. शिरभावी प्रादेशिक नळपाणी पाणीपुरवठा योजनेची तालुक्यातील ५५ ग्रामपंचायतीकडे सुमारे १ कोटी ४९ लाख रुपये थकबाकी असून, सहकारी संस्थांकडे २१ लाख ३१ हजार रुपये थकबाकी आहे तर २७ ग्रामपंचायती थकबाकी मुक्त असून, मानेगाव, डोंगरगाव, लक्ष्मीनगर व राजापूर उन्हाळ्यापुर्वी पाणी मागणी केली आहे.

शिरभावी योजनेच्या विद्युत जोडणी बाबत वरिष्ठ स्तरावर आ. डॉ बाबासाहेब देशमुख यांच्या मार्फत प्रयत्न सुरू आहेत. नवीन योजना अंशतः मार्च अखेर चालू करण्यासाठी कार्यालयाकडून प्रयत्न सुरू आहेत.जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत योजनेची ८४ टक्के कामे पूर्ण झाली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

**-देवदत्त नगरकर ,**
प्रभारी उपअभियंता

# विरशैव लिंगायत समाजाचे बहुउद्देशीय सभागृहाचे बांधकामासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण




सांगोला : सांगोला येथील विरशैव लिंगायत समाजाचे बहुउद्देशीय सभागृहाचे बांधकाम पुर्णत्वास घेऊन जावे या मागणीसाठी समस्त सांगोला येथील विरशैव लिंगायत समाजाच्यावतीने सोलापूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शुक्रवार दि.१४ फेब्रुवारी रोजी लाक्षणिक उपोषण केले.

उपोषण स्थळी माजी पालक मंत्री, आमदार विजयमालक देशमुख, माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील, नरेंद्र गंभीरे ,भाजपचे नेते श्रीकांत देशमुख यांनी भेट देवून संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क करून प्रशासनाने योग्य मार्ग काढून लिंगायत समाजाला न्याय मिळवून द्यावा असे आवाहन केले.
यावेळी सांगोला शहरातील व तालुक्यातील विरशैव लिंगायत समाज बांधव, महिला, तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांगोला शहरातील शिवाजी चौक येथील सि.स.नं.१७२९ नगरपरिषदेच्या मालकीची व जिल्हाधिकारी, जिल्हा प्रशासन अधिकारी यांनी उपोषणकर्त्यांशी संपर्क करून त्यांचे मत जाणून घेतले व यावर योग्य तो तोडगा काढून निर्णय दिला जाईल, असे सांगत उपोषण मागे घेण्यास सांगितले. वीरशैव लिंगायत समाजाच्या बंधू भगिनींनी उपोषण मागे घेतले.

विरशैव लिंगायत समाजाचे बहुउद्देशीय सभागृहाचे बांधकाम पुर्णत्वास घेऊन जावे सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण कब्जात असणाऱ्या जागेवरती सन २०२१-२२ मधील वैशिष्टपूर्ण योजनेअंतर्गत सभागृह बांधणेकरिता प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर बांधकामास तात्कालीन आमदार यांनी सन २०२१-२२ वैशिष्टपूर्ण योजनेंतर्गत रुपये ८५.०० लक्ष इतका निधी मंजूर केला आहे. याबाबत संपूर्ण प्रस्ताव तयार होवून दि.२०/०४/२०२३ रोजी सदर सभागृह बांधकामाची वर्क ऑर्डर देण्यात आली आहे. प्रशासकीय पूर्ततेप्रमाणे सि.स.नं.१७२९ मध्ये प्रत्यक्ष कामकाजास दि.०४/०५/२०२३ रोजी सुरुवात करण्यात आली. त्यावेळी सदर ठिकाण सभागृह बांधकामास हरकत घेतल्याने ठेकेदारास तोंडी आदेश देवून नगर परिषद प्रशासनाने काम बंद ठेवले आहे.

विरशैव लिंगायत समाजाने सभागृहाची मागणी केल्याप्रमाणे नगरपालिका प्रशासनाने दिलेली सि.स.नं.१७२९ मधील जागा नगरपालिका मालकीची व कब्जात असताना प्रशासनाने आपल्या अधिकाराचा योग्य वापर न करता सदर बांधकामास राजकीय दबावाखाली काम बंद करून दिरंगाई केल्याचे दिसून येत आहे. परिणामी विरशैव लिंगायत समाजाचे सभागृह बांधकामास रूपये ८५.०० लक्ष निधी परत जाण्याची संभावना निर्माण झाली आहे. याशिवाय सदर कामाबाबत मा. मुख्याधिकारी यांनी आपल्याला असलेल्या अधिकारांचा वापर न केल्याने काम पुर्णत्वास गेले नसल्याचे दिसून येत आहे.

तरी मा. जिल्हाधिकारीसो यांनी याबाबत आपल्या स्तरावर सात दिवसामध्ये विरशैव लिंगायत समाजास न्याय मिळवून दयावा.असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# सांगोला तहसील कार्यालयातील सेतू सुविधा केंद्र सुरु करावे-रवींद्र कांबळे

सांगोला : सांगोला तहसील कार्यालयातील सेतू सुविधा केंद्रे तत्काळ सुरू करण्यात यावे, अशी मागणी बहुजन समाज क्रांती संघटने संस्थापक अध्यक्ष व पत्रकार रवींद्र कांबळे यांनी सांगोल्याचे तहसीलदार संतोष कणसे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले की, विविध प्रमाणपत्राचे दाखले, जातीचे प्रमाणपत्र, उत्पन्न दाखले यास प्रतिज्ञापत्र, सातबारा हे महा-ई-सेवा केंद्रांमार्फत दिली जातात. तहसील समोरील व इतर केंद्र चालक वाजवी दरापेक्षा जास्त प्रमाणात पैसे घेतात. प्रमाणपत्र वितरीत करण्यास अडवणूक करून आर्थिक लुबाडणूक करतात व प्रमाणपत्रही वेळेवर दिले जात नाही, त्यामुळे शालेय विद्यार्थी विद्यार्थ्यांना, खूप मोठा त्रास होत आहे असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे सांगोला तहसील कार्यालयातील सेतू सुविधा केंद्र सुरू करण्यात यावे.

जेणेकरून जनतेची लुबाडणूक न होता शासनाने निश्चित केलेल्या वाजवी दरामध्ये व विहित मुदतीत जनतेला विविध प्रमाणपत्रांचे दाखले मिळतील. त्यामुळे सांगोला तहसील आवारातील शासनाचे सेतू सविधा केंद्र सुरू करावे,अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल अशी मागणी करण्यात आली आहे.

**महाराष्ट्र सरकार**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२,**
**सोलापूर सात रस्ता, कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर ४१३ ००३**
e-mail-solapur2.ee@mahapwd.gov.in दुरध्वनी / फॅक्स क्र. (०२१७) २३१२३०२
**ई- निविदा सूचना क्रमांक ३२ सन २०२४-२५ (ऑनलाइन)**

**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २, सोलापूर मजूर सहकारी संस्था यांचेकडून** खालील कामाकरिता बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा-प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निवि कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविव स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग क्र. २, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. तसेच सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल झाल्यास खालील नमूद केलेल्या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करण्यात येईल.
**टिप :-** वरील ई-निविदा सुचना मध्ये एकूण ०१ कामांचा समाविष्ट असून वरील निविदेबाबतची संपूर्ण माहिती खालीलप्रमाणे संकेतस्थळावर दि. १७/०२/२०२५ पासुन उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाचे अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | औदयोगिक प्रशिक्षण संस्था मोहोळ येथे अंतर्गत रस्ता करणे. ता. मोहोळ जि. सोलापूर | १२.७४ लक्ष |

१) http://mahapwd.com
२) http://mahatenders.gov.in
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २, सोलापूर कार्यालयातील सूचना फलक.

**जा.क्र.साबांवि-२/लेखा/निविदा/५६१/सन २०२५**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, सोलापूर

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, सोलापूर**

जिमाका/सो/जाहि/३१३/२०२४-२५

२४ तास ॲम्ब्युलन्स सेवा
विजय-लक्ष्मी कार्डिॲक ॲम्ब्युलन्स सर्व्हिस
AC/NON AC योग्य दरात उपलब्ध
Vijaylaxmi Cardiac Ambulance
AC/NON AC

संपर्कः- 7276070722
सांगोला शहरात
५ मिनिटात हजर

# स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजनेच्या कामाचे भूमिपूजन
# जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शुभहस्ते ३०० कोटींच्या कामाचा शुभारंभ

## पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांच्यासह पालक मंत्री जयकुमार गोरेंची उपस्थिती

सांगोला : सांगोला तालुक्यातील शेतीच्या पाण्यापासून वंचित असणाऱ्या सुमारे २२ गावांसाठी वरदायिनी असणारी व गेली २५ वर्षे मंजुरीच्या प्रतिक्षेत असणारी स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना म्हणजे पूर्वीची उजनी उपसा सिंचन योजना या योजनेच्या पहिल्या टप्प्यातील तीनशे कोटी रुपयांच्या कामाचा भूमिपूजन व शुभारंभ राज्याचे जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शुभहस्ते व पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री व ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे व माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर यांच्या उपस्थितीत सोमवार दिनांक १७ फेब्रुवारी रोजी दुपारी २:३० वाजता चिकमहूद येथे होणार असल्याची माहिती माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी दिली. भूमिपूजनाच्या कार्यक्रमासोबत कार्यक्रम स्थळी शेतकरी मेळावा आयोजित केल्याची माहिती माजी आमदार शहाजी बापू पाटील यांनी दिली.

सन २००० साली ७८.५९ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता या योजनेला मिळाली होती. परंतु पुढील पाच वर्षे या योजनेवर कोणताही खर्च झाला नसल्याने २००५ साली प्रशासकीय मान्यता व्यपगत झाली होती. सन २०१९ साली आमदार झाल्यानंतर शहाजीबापू पाटील यांना या योजनेच्या मंजुरीसाठी प्रयत्न सुरू केला. त्यांनी या योजनेचे स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना सांगोला असे नामकरण शासनाकडून मंजूर करून घेतले व नव्याने १० गावांचा या योजनेमध्ये समावेश करून एकूण प्रत्यक्ष अप्रत्यक्ष २२ गावांना या योजनेच्या दोन टीएमसी पाण्याचा फायदा शेतकऱ्यांना होण्यासाठी सुधारित अंदाजपत्रक तयार करून २७ फेब्रुवारी २०२४ रोजी ८८३.७४ कोटी रुपयांच्या कामाला तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्याकडून मंत्रिमंडळ बैठकीमध्ये सुधारित प्रशासकीय मान्यता मंजूर करण्यास आमदार शहाजीबापू पाटील यांनी यश मिळवले.

एकूण ८८४ कोटी रुपये खर्चाच्या या योजनेतील पहिल्या टप्प्यातील कामांची निविदा विधानसभा निवडणुकीपूर्वीच प्रसिद्ध होऊन निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कामाचे आदेश देण्यात आले होते. परंतु निवडणूक आचारसंहिता व मंत्रिमंडळ निवड यामुळे या कामाचे भूमिपूजन लांबले होते. माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी काही दिवसांपूर्वी राज्याचे जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील व पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, पालकमंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेऊन या योजनेच्या कामाचा शुभारंभ करण्याची विनंती मुंबई येथे केली होती. सर्व मान्यवरांनी सोमवार दिनांक १७ फेब्रुवारी रोजी या योजनेच्या भूमिपूजन व शुभारंभ कार्यक्रमाला वेळ दिली असून सर्व मान्यवर हेलिकॉप्टरने महूद येथे येणार आहेत.

या योजनेचे काम सुरू होणार असल्याने २२ गावांमधील सुमारे १३०५५ हेक्टर शेतजमिनींना बंदिस्त नलिकेद्वारे शेतीला लवकरच कायमस्वरूपी पाणी मिळणार असल्याने सांगोला तालुक्यातील दुष्काळ कायमस्वरूपी संपणार असून पुढील टप्प्यातील उर्वरित कामानाही लवकरच सुरुवात होणार असल्याची माहिती शहाजीबापू पाटील यांनी दिली.

# बचत गटात पैसे भरायला लावून महूदच्या ६० महिलांची फसवणूक

## आकर्षक परताव्याचे आमिष दाखविणाऱ्या पती-पत्नीवर गुन्हा

सांगोला : आकर्षक परताव्याचे आमिष दाखवून पती-पत्नीने मिळून बचतगटाच्या नावाखाली महिलेकडून प्रती महिना ३०० रुपये बचत घेऊन त्यापोटी पाच वर्षांनी मुद्दल व्याजाचा परतावा न देता महिलेची सुमारे ७२ हजार रुपयांची तसेच त्यांच्या प्रमाणे गावातील सुमारे ६० महिलांची आर्थिक फसवणूक केली. याप्रकरणी, जयश्री बिरा लवटे (रा. महूद) यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी शाहीर करीम मुलाणी व यास्मिन शाहीर मुलानी दोघेही (रा. महूद, ता. सांगोला) पती-पत्नी विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला.

फिर्यादी जयश्री लवटे यांच्या फिर्यादीनुसार शाहीर मुलाणी व पत्नी यास्मिन मुलाणी (रा. महूद, ता. सांगोला) दोघे पती-पत्नी बचत गट चालवतात. त्यांनी फिर्यादीस तुम्ही महिना ३०० रुपये बचत भरल्यास तुम्हाला पाच वर्षानंतर ३४ हजार रुपये मिळतील असे सांगून पाच वर्षे बचत भरून घेतली व त्यानंतर फिर्यादीचे नातेवाइकांनी भारतीय महिला ३०० रुपये महिना भरल्यास आकर्षक परतावा देण्याचे आश्वासन.

स्वयं सहा. बचतगट महूद, महाराष्ट्र झिंदाबाद स्वयं सहा. महिला बचतगट, महूद बु, तसेच इतर ३ बचत गट असे एकूण ५ गटामध्ये प्रती महिन्याला ३०० रुपये प्रमाणे प्रती महिना १५०० रुपये असे दि. १ फेब्रुवारी २०१९ ते ५ ऑगस्ट २०२२ पर्यंत ७२ हजार रुपये भरले. बचत गटाचे पैसे जमा करून घेताना पती-पत्नीने पैसे दिल्यानंतर कोणतीही पावती अथवा पासबुक दिले नाही.पावतीबाबत विचारले असता त्यांनी आमच्यावर विश्वास ठेवा, असे सांगून उडवाउडवीची उत्तरे दिली. पैसे जमा करतेवेळी महिलांचे रजिस्टरवर सह्याही घेतलेल्या आहेत.

दरम्यान, २०२० साली फिर्यादीच्या मुलाचे लग्नासाठी पैशाची गरज असल्याने आरोपींकडे पैशाची मागणी केली असता त्यांनी बचतगटातून पैसे मिळत नसल्याचे सांगितले. इतर सुमारे ६० महिलांची फसवणूक झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

# शिधापत्रिकेची ई-केवायसी २८ फेब्रुवारीपर्यंत शेवटची मुदत- तहसीलदार संतोष कणसे

सांगोला : तालुक्यातील शिधापत्रिकाधारकांना २८ फेब्रुवारीपर्यंत ई-केवायसी करून घेणे शासनाने बंधनकारक केले आहे. शिधापत्रिकेमधील व्यक्तींची मुदतीत ई-केवायसी न झाल्यास शिधापत्रिकेमधून नाव वगळण्यात येणार तसेच धान्य बंद होणार आहे. त्यामुळे दिलेल्या मुदतीमध्ये ई- केवायसी प्रक्रिया पूर्ण करून घेणे गरजेचे राहणार आहे. असे मत तहसीलदार संतोष कणसे यांनी सांगितले.

तहसीलदार कणसे म्हणाले की, सांगोला तहसील अंतर्गत जवळपास ७३ हजार ८४० रेशन कार्ड असून २ लाख ९६ हजार ५४ कार्डधारकांची संख्या आहे. यामध्ये रेशन सुरू असलेले अंत्योदय २९६५ अन्नसुरक्षा १९७२७ असून एकूण ४२६९६ सध्या यांना रेशन सुरू आहे त्यांना केवायसी बंधनकारक असून करणे गरजेचे आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा उपक्रमांतर्गत देशभरात स्वस्त धान्य दुकानांच्या माध्यमातून गरीब नागरिकांना अन्नधान्य पुरविले जाते. त्यासाठी लाभार्थी कुटुंबांना शिधापत्रिकेच्या मदतीने स्वस्त धान्य दुकानांवर अन्नधान्य वाटप केले जाते. दरम्यान, शिधापत्रिकाधारकांनी लवकरात लवकर ई-केवायसी करणे गरजेचे आहे. याची मुदत २८ फेब्रुवारीपर्यंत आहे. मुदतीत ई- केवायसी न केल्यास येत्या मार्चपासून संबंधित व्यक्तीचे नाव शिधापत्रिकेमधून कमी होऊन त्यांना धान्य मिळणार नाही. त्यामुळे रेशन धारकांनी आपल्या कुटुंबातील कोणत्या सदस्याची ई-केवायसी झालेली आहे आणि कोणत्या सदस्याची ई- केवायसी झालेली नाही, हे तपासणे गरजेचे आहे.

ज्या शिधापत्रिकाधारकांनी ई केवायसीची प्रक्रिया पूर्ण केलेली नाही, त्यांचे धान्य येत्या १ मार्चपासून बंद होणार आहे. त्यामुळे शिधापत्रिकाधारकांना त्यांची ई-केवायसी करणे बंधनकारक आहे.घरात किती सदस्य आहेत, एखाद्या सदस्याचा मृत्यू झालेला आहे का? या प्रश्नांची उत्तरे मिळण्यासाठी तसेच प्रत्येकाला त्यांच्या हक्काचा शिधा मिळावा यासाठी ही ई-केवायसी केली जात आहे. रेशन कार्डधारकांनी लवकरात लवकर तात्काळ ही केवायसी करावी, असे पुरवठा निरीक्षक प्रियंका जाधव यांनी सांगितले.

ज्या रेशन कार्डधारकांनी ई केवायसी ही प्रक्रिया अद्याप पूर्ण केलेली नाही, त्यांनी तातडीने करून घ्यायला हवी. अन्यथा ज्यांची ईकेवायसी झाली नाही, त्यांचे नाव शिधापत्रिकेमधून कमी होऊन धान्य पूर्णपणे बंद होणार आहे. तसेच मृत लोकांची नावे शिधापत्रिकेमधून संबंधितांनी कमी करून घेणे बंधनकारक आहे.-**प्रांजली गावंडे पुरवठा निरीक्षक**

# सांगोला शहरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे जंगी स्वागत



सांगोला : विश्वरत्न, विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे महामाता भिमाई रामजी आंबेडकर यांच्या १७१ व्या जयंतीचे औचित्य साधत सांगोला शहरात जंगी आगमन व मिरवणुक सोहळा मोठ्या उत्साही वातावरणात शुक्रवारी संपन्न झाला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यावर ठिकठिकाणी जेसीबीमधून पुष्पवृष्टी करण्यात आली. सांगोलेकरांनी मोठ्या जल्लोषात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे जंगी स्वागत केले.

यावेळी निघालेल्या भव्य मिरवणुकीत सांगोला शहर व तालुक्यातील बौद्ध समाज बंधू भगिनी, भीम अनुयायी, फुले शाहू आंबेडकर प्रेमी, तमाम बहुजन बंधू भगिनी यांच्यासह शहरातील सर्व धर्मीय नागरीक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

शुक्रवार दि.१४ फेब्रुवारी २०२५ रोजी महामाता भिमाई यांची व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची रॅली भीमनगर येथून वाढेगाव नाका, कडलास नाका, वासूद चौक, महात्मा फुले चौक, नेहरू चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, सांगोला नगरपरिषदेसमोरून, जुनी पोलीस चौकी, कचेरी रोड आदी प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थीचे बौध्द धम्मविधी करण्यात आला. हा बौध्द धम्मविधी कोल्हापूरचे भंन्ते संबोधी व गुगवाड ता.जत, जि.सांगली येथील भंन्ते गोविंदो मानदो यांनी केला. विश्वरत्न विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे स्वागत सांगोल्याचे विद्यमान आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख, मा.आमदार ॲड.शहाजीबापू पाटील, मा.आमदार दिपकआबा साळुंखे पाटील, भाजपा जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांच्यासह विविध पक्षांचे नेते मंडळी, सामाजिक संस्था, विविध क्षेत्रातील मान्यवर, सर्व समाजाच्यावतीने मोठ्या उत्साही वातावरणात करण्यात आले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा सांगोला शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान याठिकाणी उभारण्यात आला आहे. लवकरच या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरणही मोठ्या उत्साही वातावरणात करण्यात येणार असून अनेक वर्षांची मागणी पुर्णत्वास आल्याने शहरात चैतन्याचे व आनंदाचे वातावरण आहे.

सोहळा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.